# भारतामधील युती आघाड्यांच्या राजकारणाचा अभ्यास

**डॉ. आकाश शेषराव बांगर**
संशोधक विद्यार्थी
आदर्श महाविद्यालय, हिंगोली

## प्रस्तावना

पहिल्या निवडणुकीपासूनच भारतात घटकराज्यामध्ये युती आणि आघाडीच्या राजकारणाला सुरुवात झाली होती. पण ख- या अर्थाने भारतात युती आणि आघाडीच्या राजकारणाने जन्म घेतला १९९० नंतर. युतीचे राजकारण जन्म घेण्यामागे खरा उद्देश होता तो प्रादेशिकता स्थानिक मुद्दे, प्रादेशिक अस्मिता, भाषा, जात, संस्कृती यांचा. मग १९९० नंतर संपूर्ण भारतात युती आणि आघाडीच्या राजकारणाला सुरुवात झाल्यावर ज्या मुद्दयावर हे राजकारण सुरु झाले ते मुद्दे युतीच्या राजकारणाने सुटले आहेत काय ? आणि ते प्रश्न जर सुटले नसतील तर युती आघाडीचे राजकारण अपयशी ठरले काय ? किंवा ते यशस्वी झाले काय ? युतीच्या राजकारणाने भारतातील एकपक्षीय हुकूमशाही मोडित काढली काय ? हे जर खरे असेल तर २०१४ व २०१९ च्या सार्वत्रिक निवडणूकीत पुन्हा एका पक्षालाच स्पष्ट बहुमत का मिळाले ? का युतीचे राजकारण भारतीय मतदार नाकारतोय ? युतीच्या राजकारणाचा प्रादेशीक पक्ष, भारतीय संघराज्य, भारतीय शासन पध्दती, राष्ट्रीय पक्ष आणि भारतीय मतदार यांच्यावर कोणता परिणाम झाला ? युतीच्या राजकारणाचा भारताला फायदा झाला की तोटा ? यासारखे अनेक प्रश्न माझ्या मनात निर्माण झाले होते. याच प्रश्नांचा शोध घेण्याचा प्रयत्न मी सदरच्या शोधनिबंधात केला आहे.

## उद्दीष्टे

सदरील संशोधनाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१) भारतात युतीचे राजकारण अस्तित्वात का आले याचा आढावा घेणे.
२) युतीच्या राजकारणामुळे भारतीय राजकारणावरील परिणाम अभ्यासणे.
३) युतीच्या राजकारणाचे फायदे, तोटे यांचा अभ्यास करणे.

## गृहितके

सदरील संशोधनाची गृहितके खालीलप्रमाणे ठरविण्यात आलेली आहेत, संशोधनांती त्यामध्ये बदलीही होऊ शकतो.

१) लहान-लहान प्रादेशिक पक्षांना अवास्तव महत्त्व प्राप्त झाले आहे.
२) राजकिय पक्ष युतीच्या राजकारणामुळे विकासाचे नाही तर जात, भाषा, प्रादेशिक अस्मिता यांचे राजकारण करतात.
३) युतीच्या राजकारणामुळे सत्तेचे विकेंद्रीकरण झाले आहे.

## माहितीचे संकलन आणि विश्लेषण

प्रस्तुत शोधनिबंधासाठी विविध संदर्भ ग्रंथ साप्ताहिके मासिके इंटरनेटवरील वेबसाईट, या दुय्यम साधनांचा उपयोग करण्यात आला असून याठिकाणी आशय विश्लेषणाचे तंत्र वापरून मुद्देसूद पद्धतीने मांडणी करण्यात आलेली आहे.

**भारतातील युतीचे राजकारण**

भारतीयांना युतीचे किंवा आघाडीचे राजकारण हे जरी नवीन असले तरी जगात जर्मनी, हॉलंड, बेल्जियम, डेन्मार्क, ऑस्ट्रेलिया, श्रीलंका, जपान या देशात मात्र युतीच्या राजकारणाचा फार पूर्वीपासून उदय झाला आहे. ज्या देशामध्ये व्दिपक्ष पध्दत अस्तिवात असते तेथे युतीचे राजकारण पहावयास मिळत नाही. दोन्ही पक्षापकी कोणत्या तरी एका पक्षाला स्पष्ट बहुमत असते, तर ज्या देशात बहुपक्षपध्दती अस्तित्वात असते, तेथे मात्र युतीचे राजकारण जन्म घेत असते, यात वरील सर्व देशांचा समावेश होतो. पण अमेरिका व इंग्लंडमध्ये युतीचे राजकारण नाही कारण व्दिपक्षपध्दती होय.

युतीच्या राजकारणाचा उदय भारतात स्वातंत्र्यानंतर झाला पण खरा उदय १९९० नंतरच पहावयास मिळतो. भारतात १९९० पूर्वी एकाच पक्षाचे सरकार असायचे त्या पक्षाची हुकुमशाही असायची त्यामुळे अल्पमतांचे सरकार किंवा युतीचे सरकार ही संकल्पनाच भारतीय जनतेला माहित नव्हती. पण १९९० नंतर मात्र एका पक्षाची हुकूमशाही मोडित निघाली आणि एका पक्षाऐवजी युती किंवा आघाडीला सुरुवात इ. पाली. तेव्हा वाटले होते, युतीचे सरकार टिकेल कि नाही, पण आज युती, आघाड़ी भारतीय राजकारणाची अपरिहार्यता बनली आहे. भारतात आज निवडणुकीपूर्वी तर कधी निवडणुकीनंतर समविचारी पक्ष एकत्र येतात आणि युतीचे राजकारण करतात. कधी कधी तर भिन्न विचारधारेचे पक्ष एकत्र येऊन सत्ता स्थापण करतात आणि किमान समान विकास कार्यक्रम या नावाखाली सरकार चालवतात, सत्ता उपभोगतात. अशा परिस्थितीमध्ये ते लॉर्ड ॲक्टनच्या 'सत्ता माणसाला भष्ट्र बणवते आणि अधिक सत्ता माणसाला संपूर्ण राष्ट्र गावित या तत्त्वाला मात्र राजकीय पक्ष विसरतात. आज भारतात भाजप आणि त्यांचे मित्रपक्ष यांची युती कांग्रेस आणि त्यांचे मित्रपक्ष यांची युती होताना जाणवते. पण या दोन्ही आघाडयांना शह देण्यासाठी कधी-कधी तिसरी आघाडी जन्म घेताना दिसते. पण या सर्वांचा उद्देश मात्र सत्ता हाच आहे. विकासापासून मात्र ते दूर जाताना दिसत आहेत.

भारतात युतीचे राजकारण निर्माण होण्यामागे प्रादेशिक पक्षांचा उदय हे महत्वाचे कारण माणण्यात येते. केंद्रात युतीचे सरकार बणवण्यात असे लहान लहान प्रादेशिक पक्ष मोठे योगदान देतात, प्रादेशिक पक्ष, जात, धर्म, भाषा, संस्कृती, आर्थिक हितसंबंध सामाजिक हितसंबंध, प्रादेशिक अस्मिता, सत्तासंघर्ष यांचा परिपाक म्हणून अस्तिवात येतात, हे पक्ष संकुचीत मुद्दयावर तयार झालेले असल्याने साहजीकच राष्ट्रीय मुद्दे मागे पडतात, प्रादेशिक पक्षामुळे राष्ट्रीय पक्षांचा जनाधार कमी होतो आणि युतीचे राजकारण जन्म घेते. युतीच्या राजकारणामुळे काही फायदे होतात तर काही तोटेही होतात, भारतात युतीच्या राजकारणामुळे केंद्र आणि प्रादेशिक राजकारण यात सलोखा वाढला आहे. प्रादेशिक पक्षाची दृष्टी व्यापक बनते, केंद्रातील राजकीय पक्षकी प्रादेशिक पक्षाबाबत उदारता दाखवतात. संघराज्यपध्दती स्थीर व मजबूत बनते. एका पक्षाची हुकमशाही मोडित निघाली आहे. सामुहिक जबाबदारीच्या तत्वाची जोपासना झाली आहे. प्रादेशिक प्रश्नांना प्राधान्य मिळाल्याने फुटीरतेची भावना कमी झाली आहे. पूर्वी सरमनामपध्दतीने वागणारे राजकीय पक्ष आज युतीच्या राजकारणामुळे लोकशाही पद्धतीने वागतात. युतीच्या राजकारणामुळे सत्तेचे विकेंद्रीकरण झाले, बर्चस्ववादी व्यवस्थेला युतीच्या राजकारणामुळे शह मिळाला यात कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही.

युतीच्या राजकारणाने भारतात केंद्रीय शासन व्यवस्था अस्थिर केल्याची अनेक उदाहरणे आहेत. स्वतःच्या स्वार्थापोटी राजकीय पक्ष नकारात्मक राजकारण करताना दिसतात, सत्तास्थापनेसाठी अपक्ष, बंडखोर, व लहान राजकीय पक्ष, यांना अवास्तव महत्त्व प्राप्त झाले आहे. राष्ट्रीय विकासाच्या मुद्दयापेक्षा स्थानिक मुद्दयांना महत्त्व प्राप्त झाले आहे. लोकहितापेक्षा पक्षहित महत्त्वाचे ठरताना दिसते.

मूल्याधिष्ठीत राजकारणाची जागा मूल्यहिन राजकारणाने घेतली आहे. विचारसरणी हीन राजकारणाचा उदय झाला आहे पण २०१४ च्या सार्वत्रिक निवडणुकीपासून पुन्हा एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळत आहे. याचा अर्थ भारतीय जनता युतीच्या राजकारणाला कंटाळली आहे. युतीच्या राजकारणावरचा त्यांचा विश्वास उडाला आहे.

## निष्कर्ष

सदरील संशोधनातुन असे लक्षात येते की, युतीच्या राजकारणामुळे लहान-लहान प्रादेशिक पक्षांना अवास्तव महत्व प्राप्त झाले आहे. सत्तेच्या विकेंद्रीकरणात युतीच्या राजकारणाचा वाटा आहे. राजकीय पक्ष युतीच्या राजकारणामुळे राष्ट्रीय विकासापेक्षा जात, भाषा, प्रादेशिक अस्मिता, सामाजिक संबंध, इत्यादींना महत्व देत आहेत. पण आजघडीला भारतीय मतदार युतीच्या राजकारणाला कंटाळला आहे यात मात्र शंका नाही.

## संदर्भसूची

१) बी.बी. पाटील 'महाराष्ट्र शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००८-
२) प्रणय रॉय व डी. आर. सोपारीवाला अनुवाद- सतीश कामत, 'कौल लोकमताचा मनोविकास प्रकाशन, मुंबई २००८.
३) 'श्रीकांत.वि.देशपांडे' भारताचे शासन आणि राजकारण, मंगेश प्रकाशन, नागपूर २००९. ४) विजय चोरमारे, महाराष्ट्राचे राजकारण नवे संदर्भ, नवता वर्ल्ड, मुंबई २०१४.
४) 'राजकारण कूस बदलते आहे, दै लोकसत्ता. १२ ऑक्टोंबर २०१४
५) भारतीय राजकारणातील सरंजामशाही, 'EPW-Vol-43. Issue No-२०, १९ मे २०१८